Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# पांगिरा: पाण्याच्या अपव्ययाने उधळत जाणारी समृद्ध गावाची हळवी यात्रा

**रुपाली प्रकाश जगताप,** संशोधक विद्यार्थी, नंदुरबार तालुका विधायक समितीचे ग. तु. पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार ता.जि. नंदुरबार
**डॉ. माधव कौतिक कदम,** सहयोगी प्राध्यापक, संशोधक मार्गदर्शक, नंदुरबार तालुका विधायक समितीचे ग. तु. पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार ता.जि. नंदुरबार

## प्रास्ताविक

"युवा पिढीला मनोरंजनाच्या माध्यमातून सामान्य नागरिक घडविण्यासाठी चित्रपट मोठी भूमिका बजावतात."

वॉल्ट डिस्ने, अमेरिकन अभिनेता व चित्रपट निर्माता.

चित्रपट हे मनोरंजनाचे साधन असले तरी त्यातून समाजात लोकप्रबोधन व जनजागृती घडविण्याचे कामही केले जाते. अगदी सुरुवातीपासूनच पाहिले तर चित्रपटाचे विषय पौराणिक कथा, संत साहित्य, ऐतिहासिक घटना, प्रसंग, समाजातील अनिष्ट प्रथा, परंपरा, सामाजिक प्रश्न आणि भान यांना जपणारे होते. अलीकडे तर त्यात मानवी जीवनातील प्रश्न आणि भविष्यात उद्भवणाऱ्या समस्यांवर ही प्रकाश टाकला जातोय. भारताची वाढती लोकसंख्या आणि या लोकसंख्येच्या मानाने उपलब्ध पाणी साठा लक्षात घेता भविष्यात पाण्यासाठी महायुद्ध झाल्याशिवाय राहणार नाही आणि म्हणूनच आज अनेक मराठी चित्रपटातून पाणी प्रश्नावर प्रकाश टाकला जात आहे. "तहान" (2008) दिग्दर्शक दासबाबू यांच्या या चित्रपटात घोटभर पाण्यासाठी वणवण भटकणाऱ्या त्रस्त सामान्य जनतेचे चित्रण करण्यात आलेले आहे. "बारोमास"(2012), "पिपाणी"(2012), "गार्भीचा पाऊस" (2009), "पांगिरा"(2011), आणि नुकताच अलीकडे मराठवाड्यातील पाणीटंचाईच्या समस्येवर उपाय शोधणाऱ्या हनुमंत केंद्रे यांच्या वर आधारित आणि राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त 'पाणी' हा चित्रपट असो, यातून थोड्याफार फरकाने का असेना पाणी टंचाईवर भाष्य करण्यात आले आहे. तर कुठे अति पावसाचे परिणाम दाखवण्यात आले आहे.

"गरज बरस प्यासी धरती पर
फिर पानी दे मौला....चिडियोंको दाणे,
बच्चों को गुडदाणी दे मौला पानी दे मौला"

लेखक विश्वास पाटील लिखित कादंबरीवर दिग्दर्शक राजीव पाटील यांनी पांगिरा हा चित्रपट 2011 साली बनवला.

वास्तविकतेचे भान ठेवून जिवंत पात्रांसह ज्वलंत प्रश्नांना समाजापुढे मांडण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न आणि चित्रपटातून येणाऱ्या पांगिरा या गावातील पाण्याचा अपव्यय, सततचा उपसा, आणि कमी होत जाणारी भूजल पातळी यामुळे निसर्गाच्या मांडीवर हसत खेळत समृद्ध होणार गाव आणि त्याच गावाचं दुष्काळी गावांच्या यादीत जाणार नाव इथपर्यंतचा प्रवास आपल्यापुढे चित्रपटाच्या माध्यमातून मांडला आहे.

## उद्दिष्टे -

१) मराठी कादंबरी आणि चित्रपटातील फरक शोधणे.
२) कादंबरीचे प्रतिबिंब जसेच्या तसे चित्रपटात पडले आहे का ते पाहणे.

 Copyright © | JET Network, All Rights Reserved

३) साहित्य आणि चित्रपट यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
४) चित्रपटातून आलेल्या पाणी समस्या आणि त्यावरील उपाय योजनांचा शोध घेणे .
५) चित्रपटातील वेगवेगळया व्यक्तीरेखांचा अभ्यास करणे.
६) चित्रपटातून आलेल्या पाण्याच्या भीषण प्रश्नांचा येत्या काही काळात समाजावर होणाऱ्या प्रतिकूल परिणामांची चर्चा करणे .

**कथानक -**

चित्रपट सुरू होतो ते पाणी पंचायतीमार्फत आमरण उपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांपासून. चांगली शेती ही चौरस फुटात मोजायची नसते तर ती घनफुटात मोजायची असते आणि हे घनफूट जमिनीच्या वर जसे असतात तसे ते जमिनीच्या खालीही असतात .हे कधी न सरकारला कळलं ना जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्याला. बाष्पीभवनामुळे भूपृष्ठ पाण्यात होणारी घट ही उन्हाळी हंगामात दुपटीने जास्त असते आणि ती टाळावी म्हणूनच हे उपोषण सुरू होतं आणि त्यात कित्येक बळीही जातात. मुळात पाण्यासाठी उपोषण हेच एक कटू सत्य दाखवण्यात आले आहे. सुमित्रा(मीता सावरकर) ही पीएचडी प्रबंध " गायब होत जाणारी भूजल पातळी आणि त्या अनुषंगाने करावयाची पीक रचना" या विषयासाठी क्षेत्रभेट म्हणून 'पांगिरा 'हे गाव गाठते. तिथे मुरार पाटील (प्रमोद पवार) तिला संपूर्ण पांगिरा गाव दाखवतात व पांगिराची माहिती ही सांगतात. गावात तान्या भिलारे (संतोष जुवेकर) सरपंच सोकाजी डोकरे(किशोर कदम) च्या सांगण्यावरून गावातील वडाचे झाड तोडायला घेतो.मुरार पाटील व गावचे पोलीस पाटील ज्ञानू सावळा(धनंजय माद्रेकर) त्याला अडवतात. ज्ञानू सावळा आपल गाऱ्हाणे घेऊन जिल्हा परिषद अध्यक्षांकडे जातो . इकडे सुमित्रा मुरार पाटलांच्या घरी येते. तिथे तिची ओळख राधाई (नंदिनी जोग) बाजी (प्रशांत पाटील) आणि लक्ष्मी (मधुगंधा कुलकर्णी)मुरार पाटलाची बायको मुलगा आणि सुनेशी होते. बाजी मुरार पाटलाला गावातील झाडांच्या भानगडीत पडू नका म्हणून ओरडतो. त्यावर सुमित्रा त्याला झाडे तोडूच नये म्हणून समजावते. इकडे सोकाजी आणि तान्या भिलारे आमदार माणिकरावजी भोसले (उपेंद्र लिमये )यांना फोन करून देवस्थानाच्या झाडासंबंधी बोलतो. सिदुबा देवळाचं जीर्णोद्धार करण्याच्या नावाखाली गावातील झाडे तोडायचे हे आमदाराचे नवे राजकारण. भिकू अण्णा( गिरीश साळवी)गावातील लोकांच्या कोर्टकचेरीचे काम पाहतात.हौसा (स्मिता तांबे) भिकु अण्णा कडे तुका भाऊजीची (संजय कुलकर्णी) शेतातील विहिरी चे पाणी वापरु देत नसल्याची तक्रार घेऊन येते. इकडे तहसीलदाराच्या आदेशान्वये गावात महाराष्ट्र जमीन महसूल लाकूडतोड व लाकडाचा पुरवठा इत्यादी नियमन (नियम 1970) उपनियम 1, 2 व 3 नुसार झाडांची तोड करण्यास मनाई करण्यात येते. धुळा (चिन्मय मांडलेकर) आणि हौसा सोकाजीकडे शेतीचे गाऱ्हाणे घेऊन येतात. सोकाजी धुळाला रानात तुकाच्या विहिरी शेजारीच विहीर खोदण्याचे सांगतो. धुळा व तुका दोघे सख्खे भाऊ पण शेतातील विहिरीतल्या पाण्यावरून आता ते पक्के वैरी झाले आहेत. सुमित्रा गावकऱ्यांची सभा घेऊन त्यांना पाण्याचे नियोजन व पीक रचना कशी घ्यावी यासाठी सरपंच सोकाजी डोकरेची परवानगी घेते. नंतर मुरार पाटील तिला डोंगरवाडीला घेऊन जातात. तिथे तिची बत्ताशा( शशांक शेंडे) आणि बजाबा तात्या (नारायण जाधव) यांच्याशी ओळख होते. तिथेच सखू आणि सुगंधा दूरवरून पाणी वाहताना दिसतात .डोंगरवाडी वर पाणी आहे मात्र ते पिण्यायोग्य नाही यासाठी डोंगरवाडी कर डोंगरवाडी च्या पायथ्याशी असलेल्या पांगिरातुन पिण्यासाठी पाणी वाहून आणतात गावाच्या सभेत सुमित्रा सगळयांना “पाणी अडवा व जिरवा” योजनेची माहिती देते शेतीला


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

कमीत कमी व पिकापुरते पाणी देण्याचे, पीक रचनेत बदल करण्यास सांगते. यावर तान्या भिलारे व सोकाजी हे सार हसण्यावर नेतात, तेव्हा सुमित्रा सांगते की जर तुम्ही पाणी जपून वापरलं नाही तर शेतीलाच नाही तर पिण्यालाही पाणी मिळणार नाही. गावाचे वाळवंट होईल असं भाकीतही करते. गावातील विचारे मास्तर रिटायर झाल्यापासून अंबाबाईच्या पडक्या देवळाची सेवा करतात व देवळाच्या देखभालीवर खर्चही करतात. त्यावर त्यांचा मुलगा अंकुश खूप संतापतो .गावात सोकाजी च्या"सिदुबा सहकारी दूध सोसायटीच्या" उद्घाटनाला आमदार माणिकरावजी भोसले येतात .लोकांकडून दुधावर मिळणाऱ्या पैशात दहा टक्के कपात केली जाते. सखू (शर्वाणी पिल्ले) त्यावर सोकाजीला चांगलेच सुनावते. गोरगरिबांचा पैसा मातीत दाबू नका अशी विनवणी ही करते.

बजाबा तात्या, सखु सुमित्राला सोकाजी गावच्या विकास कामात कसा मोडता घालतो आणि गोरगरिबांचे पैसे कसे  लाटतो ते सांगतात. अजूनही डोंगरवाडी वर नळ आणि वीज नाही. सुमित्रा कडील मोबाईल बघून सखुला त्या मोबाईलचे नवल वाटते. ग्रामसभेत सरपंच पदाची नेमणूक होते त्यात पुन्हा सोकाजीला सरपंच आणि बाजी मुराररराव पाटील ला उपसरपंच बनवण्यात येते.  "तुम्ही आधीच सारं ठरवलेलं असतं मग आम्हा डोंगरवाडीकरांना का बोलावतात ?" असे बोलुन बत्ताशा चिडून निघून जातो. भिकू अण्णा गावकऱ्यांना जिल्हा बँकेच्या पैशातून नवीन गुरांची खरेदी करताना कोणते नवीन नियम आलेत ते सभेत सगळ्यांना सांगतो. इकडे लक्ष्मी बाजी उपसरपंच झाला म्हणून सगळ्यांना पेढे वाटत फिरते. तेवढ्यात जना (हेमांगी कवी) धावतच मुरार पाटलाकडे येते .धुळा व तुका विहिरीच्या पाण्यावरून एकमेकांच्या जीवावर उठतात .सोकाजी पाण्याचे राजकारण करून त्या दोघा भावांमध्ये भांडण लावतो. राधाई लक्ष्मी व बाजीला सोकाजी पासून दूर राहण्याचे सांगते. बाजी ने उपसरपंच पदाचा मोह टाळायला हवा होता असंही ती म्हणते. त्यावर दोघेही आम्हाला संसार वाटून पाहिजे म्हणून सांगतात. मुरार पाटलाच्या घराची वाटणी होते. रात्री गावात गावातील सगळीच तरणी ताठी पोर , बाजी, सोकाजी, भिकू अण्णा, सगळी गावात वाजत गाजत मिरवणूक काढतात. आपली जनावरे आपण जिल्हा बँकेकडून विकत घ्यायची ही शक्कल भिकू अण्णा लढवतात. त्यामुळे गावकरी खुश होतात .

तुका सोकाजीला धुळाला विहीर खोदण्यापासून थांबवण्यासाठी पैसे देतो. सुमित्रा गावातील ही सगळी परिस्थिती पाहून खूप अस्वस्थ होते. इकडे मनाई आदेश आल्याने धुळा पुन्हा सोकाजी कडे येतो. गावात बोरिंग मशीन मागवले जाते. सुगंधाच्या लग्नात मुरार पाटील धुळा व तुकाला समजावतात .दोघांची समजूत घालतात .मात्र दोघेही भाऊ ऐकत नाही. सोकाजीच्या बोरींगच काम पाहून धुळा पण आपल्या शेतात बोरिंग करायचं ठरवतो. “धरतीचं काळीज फाडून पाणी काढायचं” असेही तो म्हणतो जमिनीचा सातबारा सोकाजी  कडे गहाण टाकून पैसे घेतो. दुसऱ्या दिवशी झेल्या गावातील लोकांना पत्रे वाटतो. भिकू अण्णा ती पत्र वाचून दाखवतो. पत्रात कसबा पांगिरा गावात बेकायदेशीर वहिवाट करीत आहेत तेव्हा सदरहू जमिनीशी तुमचा काहीही संबंध नाही ही सगळी जमीन मुंबई ट्रस्ट कायद्याप्रमाणे जगन माता अंबाई ट्रस्टच्या मालकीची झाली आहे. व सर्व जमिनी विचारे गुरुजींच्या नावे करण्यात आली आहेत अशा नोटिसा देण्यात येतात. इकडे धुळा तुकाच्या विहिरी शेजारीच बोरींगचे काम सुरू करतो. सर्व गावकरी अंबाबाईच्या मंदिरात जातात. विचारे गुरुजीला जाब विचारतात. मात्र विचारे गुरुजींनी आधीच स्वरक्षणासाठी दोन बंदूकधारी बोलवून ठेवलेले असतात .सुमित्रा वन अधिकाऱ्यांकडे वसंत धरण योजनेसाठी मागणी करते. साहेब जनावरांचे पंचनामे करण्यास सांगतात .भिकू अण्णा गावकऱ्यांकडून


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

खोटी माहिती जमा करून पंचनाम्याची जादा रक्कम स्वतःच्या खिशात टाकतो. विचारे गुरुजी सोकाजी अंकुश तानाजी भिलारे यांनी मिळून जगन माता अंबाई ट्रस्ट चालवलेली असते. मोठ्या हुशारीने ते गावकऱ्यांची जमीन स्वतःच्या नावाने करतात. सोकाजी बाजीरावाचे रान नांगरतो. तेव्हा बाजी व लक्ष्मीला सोकाजी चा खरा चेहरा कळतो. ते धावत येऊन मुरार पाटलाचे पाय धरतात. आपली जमीन सोकाजी ने गिळली हे ऐकून मुरार पाटील हतबल होतो धुळाच्या बोरिंग ला एक थेंबही पाणी लागत नाही .मुरार पाटील सोकाजी ला जाब विचारायला जातो, तेव्हा कर्जाचे 50 हजार द्या आणि जमीन घेऊन जा असं सोकाजी म्हणतो. हौसा हात पंपावर जीवाचं रान करून पाणी उपसण्याचा प्रयत्न करते पण पाणी येत नाही. रात्री धुळा तुकाची हत्या करतो. बत्ताशा धावत येऊन डोंगरवाडी वर बातमी देतो, आमदार साहेब डोंगरवाडी च्या पायथ्याशी बंधारा बांधताय म्हणे. यावर सर्व डोंगरवाडी नाखुश होते .पाण्याचा साठा डोंगरवाडीत आणि पाझर पांगिर्यात हे डोंगरवाडीकरांना मान्य होत नाहीत. सुमित्रा मुरार पाटील व बजाबा तात्याला घेऊन बंधारा बांधणाऱ्या अधिकाऱ्यांकडे जाते. व त्यांना सर्वेसाठी विनवते. मात्र सोकाजी आधीच पांझर तलावासाठी डोंगरवाडीच्या पायथ्याशी मोजमाप करायला माणसे आणतो. संतापलेले डोंगरवाडी कर त्या लोकांना मारून मारून तिथून हाकलून लावतात. मात्र याचा बदला म्हणून पांगिरकर डोंगरवाडीकरांची घरे जाळून टाकतो .सुमित्रा सोकाजी, विचारे गुरुजी ,तान्या ,भिकू अण्णा, यांना सगळया गावासमोर प्रश्न विचारते. जनतेच्या काळजीच आव आणतात मग त्यांना बेहिशोबी पाण्याच्या वापरावर का बोलत नाही ?कमी पाण्यावर येणाऱ्या पिकासाठी का झटत नाही? चारा तगाई चे पैसे  का लाटतात? विचारे गुरुजी सोबत गुरव समाजाची जमिनी बळकवतात, नका करू असे घाणेरडे राजकारण! इकडे जामिनवर सुटलेला धुळा घरी येतो .त्याला झालेल्या कृत्याबद्दल खूप पश्चाताप आहे. सोकाजी ला आपल्या चुकांची जाणीव होते. तो गावकऱ्यांसमोर डोंगरवाडीकरांची माफी मागतो. डोंगरवाडीच्या पायथ्याशी असलेली बंधाऱ्याची जागा बदलून बंधाऱ्यासाठी नवीन जागा बघण्यासाठी काही हरकत नाही असा ठराव मामलेदाराकडे पाठवतो. आता गावात आणि गावकऱ्यात थोडं चैतन्य संचारतं. गावकरी शेतात कमी पीक पाणी वर आधारित कांदे पिकाची लागवड करतात.

सर्व गावकरी खुश असतात. कांद्याची पिकं भरभरून येतात.सर्वजण आपापले कांदे घेऊन बाजारपेठेत जातात. तिथे व्यापारी कांद्याला क्विंटलला सहाशे रुपये भाव देतो,मात्र पांगिरकरांचे पीक घेतलं जात नाही. दुसऱ्या दिवशी त्यांना बोलावलं जातं. गावकरी कांदे विकून येणाऱ्या पैशातून स्वतःची स्वप्ने पाहू लागतात. मात्र दुसऱ्या दिवशी व्यापारी लिलावात कांद्याला खूप कमी भाव लावतात. पांगिरकर निराश होतात. व्यापारी लिलाव मध्येच बंद करतात. सुमित्रा सगळयांना घेऊन कमिटीच्या ऑफिसात जाते. मात्र चेअरमन साहेब मुंबईला निघून गेलेले असतात. सुमित्रा व्यापारी संघाच्या अध्यक्षांना भेटते. इकडे व्यापारी लिलाव करण्यास मनाई करतात. सोकाजी आमदाराला फोन करतो मात्र तो फोन घेत नाही .आमदार व्यापाऱ्यांना दोनशे रुपये क्विंटल च्या भावाने कांदा विकत घेण्यास सांगतो. दर खाली पडल्याने पांगिरकर अस्वस्थ होतात सोकाजी आमदाराचे पाय धरतो. पांगिरकरांना वाचवा म्हणून सांगतो. आमदार मात्र काहीही करत नाही. सोकाजी हताश होऊन परत येतो. पांगिरकर आपला कांदा घेऊन तसेच बाजारपेठेमध्ये रात्रभर बसून राहतात .तान्या रडू लागतो. आमदाराच्या नादी लागायचं नाही म्हणून ठरवतो. प्रत्येकालाच दुसऱ्या दिवशी होणाऱ्या लिलावाची काळजी वाटते आणि आयुष्यात केलेल्या प्रत्येक चुकांबद्दल वाईटही वाटते. प्रत्येकजण पश्चातापाचे अश्रू ढाळत बसतो. सोकाजी सुमित्राला भेटतो कमी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

पाण्यात पिकणारे पीक घेऊन सर्व पांगिरकरांना मी इथे घेऊन आलोय हे सांगतो. व्यापारी पोलीस बंदोबस्तात लिलाव सुरू करतात. पावणे दोनशे रुपये भाव येतो. शेतकरी संतापतात. मुरार पाटील पोलिसांना व्यापाऱ्यांना अटक करायला लावतो. वातावरण हाताबाहेर जाते. शेतकरी रागाने व्यापाऱ्यांवर तुटून पडतात. अश्रु धुराच्या कांड्या सोडल्या जातात. शेतकऱ्यांना लाठीने मारले जाते. सगळा कांदा पायाखाली तुडवला जातो. मुरार सगळ्यांना विनंती करतोय हे सगळं थांबवण्यासाठी ओरडतोय. "भूमिपुत्रांना मारू नका" म्हणून पोट तिडकीने सांगतोय. सुमित्रा फोन करून तातडीची मदत मागते .सुमित्रा आईला फोन करते आणि "आई मला तुला भेटावसं वाटतंय, तुझ्या कुशीत येऊन झोपावसं वाटतय" असे म्हणते. परिस्थिती नियंत्रणा बाहेर जाते. पोलीस जमावावर गोळाबार करतात. यात धुळा बत्ताशा, सुमित्रा आणि इतर शेतकऱ्यांना गोळी लागते. आणि ते मरण पावतात. मुरार पाटील आणि राधाई सुमित्राचा देह मांडीवर घेऊन हंबरडा फोडतात. कादंयाची टरफल त्या निष्प्राण देहावर वर्षाव करतात.

## सारांश

पाण्यासारख्या ज्वलंत प्रश्नावर राजीव पाटील दिग्दर्शित या चित्रपटाचा नायक खरंतर कादंबरी प्रमाणे सगळा पांगिरकर आहे. वर्षानुवर्ष चालत आलेली घाणेरडे राजकारण, आणि गाव विकासाच्या नावाने पांगिरकांची होणारी लूट आणि खालावत चाललेली भूजल पातळी चित्रपटात अत्यंत मर्म स्पर्शाने दाखवली आहे. सुमित्रा (मिता सावरकर) हे पात्र चित्रपटात नव्याने घेण्यात आले आहे. सुमित्राचा गावाप्रती आदर, निसर्गावर असलेली तिचे प्रेम ,पाण्याची होणारी नासाडी थांबवण्यासाठी तिने केलेले प्रयत्न थक्क करते. पांगिरा बद्दल बोलताना "ऊन पावसासारखं असतं हे जग सुमित्रे, करपून गेलं म्हणून उतायच नाही आणि हिरवगार झालं म्हणून मातायचं नाही" हे मुरार पाटलाचं वाक्य हृदयाला भेदुन जाते. पश्चाताप झाल्यानंतर सुमित्राची माफी मागणारा सोकाजी (किशोर कदम) "पाखरांच्या चोचीतलं दान आणि लेकरांच्या व्हटातलं गाणं आयुष्यभर सांभाळून ठेवील असं काहीतरी बी बियाणं शोधून काढ सुमित्रे" म्हणून ढसाढसा रडतो. आणि सरते शेवटी बाजारपेठेत दर पाडून लिलाव झालेला कांदा आणि कांद्याची अवहेलना व्याकुळ शेतकरी, पोलिसांचा गोळीबार आणि चिखलाने, रक्ताने माखलेला कांदा आणि त्यावर निश्चित पडलेले पांगिरकरांचे आणि सुमित्राचा देह "घाव पडला पडला पाण्याच्या पायी" हे सारं काही मन सुन्न करते आणि पाण्याची भविष्यातील टंचाई आणि शेतकऱ्यांसोबत साऱ्यांचेच होणारे हाल आणि पाण्यासाठी होणारे खून हे भविष्याकडे निर्देश करतात.

## संदर्भ

1. पांगिरा - विश्वास पाटील.
2. मराठी कादंबरी : समीक्षा - प्रा.डॉ.तानाजी राऊ पाटील.
3. ग्रंथ, चित्रपट समीक्षा (लेखन कौशल्य व उपयोजन) - प्राचार्य डॉ.स.ना.भारंबे, डॉ. प्रभावती महाजन.
4. चित्रपट परीक्षण : पांगिरा, Divya Marathi @MIUI, पुस्तक परिचय.....: "पांगिरा"
5. pangira-film | चित्रपट परीक्षण: पांगिरा | Divya Marathi
6. https://marathimovieworld.com/news/pangira-2.php
7. https://goanvarta.net/story.php?id=29508


Copyright © | JET Network, All Rights Reserved